॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

A' Grade

'(NAAC Re-Accredited )

3rd Cycle

# North Maharashtra University, Jalgaon
# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

पत्रपेटी क्र. ८०, उमविनगर, जळगाव- ४२५००१
दूरध्वनी क्र. (०२५७) २२५७२४८, २४९,२५३ फॅक्स क्र. २२५८४०३, ४०६

जळगाव दि. 5 ( ) उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विद्यापीठ विभाग विद्यार्थी परिषदेच्या सचिव पदासाठी शुक्रवारी झालेल्या निवडणूकीत यु.आय.सी.टी.चा विद्यार्थी गोविंद पाटील हा निवडून आला.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यपीठ अधिनियम 2016 यात सुधारणा करण्याकरिता 28 नोव्हेंबर रोजी महाराष्ट्र शासनाने अध्यादेश प्रसिध्द केला होता. त्या अध्यादेशातील कलम 99, उपकलम (3) नुसार विद्यापीठ विभाग विद्यार्थी परिषद सदस्यांमधून सचिव पदाच्या निवडीसाठी शुक्रवार, दि.5 जानेवारी रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीच्या अध्यक्षस्थानी कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील होते.

या बैठकीत सचिव पदाच्या निवडणूकीसाठी तीन जणांनी उमेदवारी अर्ज दाखल केले. बैठकीला 36 पैकी 34 सदस्य उपस्थित होते. त्यामुळे निवडणूकीनंतर विजयासाठी 17 मतांचा कोटा निश्चित करण्यात आला. पूर्वा जाधव (केमिकल सायन्सेस्) विद्यार्थिनीला पहिल्या फेरीत 14 मते, कल्पना मोते (सामाजिकशास्त्रे विभाग) या विद्यार्थिनीला 9 मते आणि गोविंद पाटील (युआयसीटी) या विद्यार्थ्याला 10 मते पडली. कल्पना मोते ही पहिल्या फेरीत बाद झाल्यामुळे तिच्या दुसऱ्या पसंतीच्या मतांची मोजणी केली असता गोविंद पाटीलला 7 तर पूर्वा जाधवला 2 मते स्थानांतरीत झाली. 17 मतांचा कोटा पूर्ण केल्यामुळे गोविंद पाटील यास विजयी घोषित करण्यात आले.

या निवडणूक प्रक्रियेसाठी कुलसचिव भ.भा.पाटील, सहाय्यक कुलसचिव आर.बी.उगले व एन.जी.पाटील यांनी सहकार्य केले. कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांनी गोविंद पाटील याचा सत्कार केला. यावेळी विद्यार्थी विकास विभागाचे प्रभारी संचालक प्रा.एस.टी.इंगळे उपस्थित होते.

---

जा.क्र: उमवि/१६/हस्तदेय/२०१८ दिनांक : ५ जानेवारी, २०१८

प्रति,
**मा. संपादक / प्रतिनिधी**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत प्रत/-
(सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी